भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना सन २०१८-१९ मध्ये राबविताना सर्वसाधारण प्रवर्गासाठी रू.१०० लक्ष निधी अर्थसंकल्पिय वितरणप्रणालीवर उपलब्ध करून देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि,पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्र. फुंफला-२०१८/प्र.क्र.२३५/९-अे,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २७ मार्च, २०१९

संदर्भ:-

१. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. फुंफला-२०१८/प्र.क्र.२३५/९अे, दि.०९/०१/२०१९
२. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.पूरक -२०१९/प्र.क्र.४१/अर्थ-३, दि.०८/०३/२०१९
३. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.अर्थसं -२०१९/प्र.क्र.४२/अर्थ-३, दि.०८/०३/२०१९
४. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्र.अंदाज-२०१८/(प्र.क्र.५५/१८)/२अे, दि.१४/०३/२०१९

प्रस्तावना :-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत जे शेतकरी फळबाग लागवडीकरिता पात्र ठरु शकत नाहीत अशा शेतकऱ्यांसाठी राज्य शासनाने भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना सुरू केली आहे. संदर्भाधीन क्र.१ येथील दि.०९/०१/२०१८ च्या शासन निर्णयानुसार सन २०१८-१९ मध्ये भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेच्या अंमलबजावणीकरिता सर्वसाधारण प्रवर्गासाठी रू.७०० लक्ष (रू.सात कोटी फक्त)निधी आयुक्त (कृषि) यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात आला आहे. वित्त विभागाच्या मंजूर सुधारित अंदाजानुसार आणखी रू.१००.०० लाख निधी सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय:-

१. सन २०१८-१९ मध्ये भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेच्या अंमलबजावणीकरिता सर्वसाधारण प्रवर्गासाठी रू.१०० लक्ष (रू.एक कोटी फक्त)निधी आयुक्त (कृषि) यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात येत आहे.

२. सदर निधी खालील लेखाशीर्षांतर्गत चालू वर्षी अर्थसंकल्पित केलेल्या तरतूदीतून खर्ची टाकावा.

मागणी क्र. डी-३
२४०१- पिक संवर्धन
११९, बागायती व भाजीपाला पिके,
फळे (३३)
भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना
(२४०१ A८८९)
३३ अर्थसहाय्य

३. सदर योजना राबविताना सदर प्रकरणी यापूर्वी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार कार्यवाही करण्यात यावी.

४. निधी खर्च करताना महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका व वित्तीय अधिकार नियम पुस्तीकेमध्ये उल्लेख केलेल्या तसेच नियोजन व वित्त विभागाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना व प्रचलित अटी व शर्तीचे व वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाने संदर्भाधीन क्र.२ व ३ येथील दि.०८/०३/२०१९ रोजी निर्गमित परिपत्रकांन्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२७१७२००१९४०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Ashok Maroti Atram
Date: 2019.03.27 17:23:18 +05'30'

(अशोक आत्राम)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई -३२
२. मा. मंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२
३. मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद, महाराष्ट्र राज्य, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा, महाराष्ट्र राज्य, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५. मा.राज्यमंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२
६. सचिव, (कृषि) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
७. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य,पुणे.
१०. सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
११. सर्व विभागीय कृषि सहसंचालक, महाराष्ट्र राज्य.
१२. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१३. सहाय्यक संचालक (लेखा) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१४. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा) मुंबई /नागपूर,
१५. संचालक लेखा व कोषागार अधिकारी, मुंबई (२ प्रती)
१६. सहसंचालक लेखा व कोषागारे संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५वा मजला, मुंबई -३२
१७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१८. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१९. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
२०. माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२.
२१. निवड नस्ती/९-अे.